**CNR No. MHOS120000292022**

**नि.दि.दावा क्र. ४/२०२२ मधील निशाणी क्र. १४ खालील आदेश**

१. विचाराधिन अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र. ९ बापुराव काळे हा मयत झाल्यामुळे व त्याची पत्नी प्रतिवादी क्र. १० ही त्याची वारस म्हणून अभिलेखावर याआधीच समाविष्ठ असल्यामुळे प्रतिवादी क्र. ९ याचे नाव दाव्यातुन कमी करुन त्याच्या नावासमोर मयत असे लिहीण्यास निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे प्रस्तुत अर्जास त्यांची हरकत असल्याचे नमुद केले आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

४. याकामी प्रस्तुतचा दावा हा जाहिर हुकूम, अनिवार्य निषेधाज्ञा तसेच कायमची मनाई ताकीद व दरम्यानचे उत्पंन्न मिळण्यासाठी दाखल केला आहे. याकामी वादीने दस्तऐवज यादी नि.क्र. २४ येथे अनुक्रमांक १ व २ येथे कागदपत्र दाखल केले आहे. नि.क्र. २४/१ हे सरपंच ग्रामपंचायत सटवाईवाडी यांनी दिलेले प्रमाणपत्र आहे. त्या प्रमाणपत्रानुसार प्रतिवादी क्र. ९ बापुराव काळे यांचा मृत्यु पुणे येथे झाल्याचे नमुद केले आहे. नि.क्र. २४/२ ज्याला निशाणी क्र. २५ देण्यात आली आहे हे वादीने दिलेले शपथपत्र आहे. त्या शपथपत्रानुसार प्रतिवादी क्र. ९ हा मयत झाला असून त्याच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत सटवाईवाडी येथे झालेली नाही असे शपथपत्र दिलेले आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ सोडून इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी केवळ त्यांची प्रस्तुत अर्जास हरकत आहे एवढेच नमुद केले आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी त्यांची प्रस्तुत अर्जास का हरकत आहे याबाबत काहीही कथन केले नाही. एखादा दावा कोणाविरुध्द चालवायचा अथवा नाही चालवायचा ही वादीची निवड असते. त्यामुळे निशाणी क्र. २४/१

व निशाणी क्र. २५ वरील दाखल कागदपत्रानुसार प्रतिवादी क्र. ९ हा मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र. १० जी प्रतिवादी क्र. ९ ची वारस आहे तिनेदेखील प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन कोणताही आक्षेप नोंदवला नाही. सबब, वादीने मागीतलेली दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, खालील आदेश.

**<u>आ दे श</u>**

१ निशाणी क्र. १४ खालील अर्ज मंजूर करण्यात येतात.

२ वादीने आवश्यक ती दुरूस्ती आज तारखेपासून १४ दिवसाच्या आत करण्याची आहे.

३ प्रस्तुत अर्जाचा खर्च वादीने सोसण्याचा आहे.

Digitally signed by AMOGH PRABHAKAR KULKARNI
Date: 2022.10.10 04:37:32 +0530

दिनांक : ०६/१०/२०२२.

( अ.प्र.कुलकर्णी ),
सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
भूम.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | A. P. Kulkarni<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 06/10/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 06/10/2022 |
| Order uploaded on | --- | 10/10/2022 |